नियमीत फौजदारी खटला क्र. **५१/२०२४**
निशाणी क्र. **२४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **राकेश यशवंत मेहेतर** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : (नोकरी) पोलीस हवालदार |
| सध्या नेमणूक | : | पोयनाड पोलीस ठाणे |
| निवासस्थान | : | मु. पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत** :

दि. १८/०१/२०२४ ते १९/०१/२०२४ या कालावधीत माझी रात्री गस्तीसाठी ड्युटी होती. सहाय्यक फौजदार ठाकूर आणि मी सांबरी खिंड या परिसरात एम् एच् ०६ सी डी ९७९२ या सरकारी वाहनाने रात्रीची गस्त करत होतो. गस्त करत असताना बिडवागळे पोलीस पाटील नंदकुमार जगन्नाथ म्हात्रे यांनी फोनवरुन सांगितले की, बिडवागळे गावात एक टेम्पो संशयितरित्या फिरत आहे. त्यावेळी मी व ठाकूर असे सरकारी वाहनाने खात्री करण्याकरीता बिडवागळे गावात गेलो.

०२. तेथे गेलो असता गावातील मंदीराजवळ पोलीस पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते. पहाटे ०२.३० वाजताच्या दरम्यान कामतवाडी बाजूकडून कुर्डुसकडे जाण्याकरीता एक मोटरसायकलस्वार आणि त्याच्या पाठीमागे एक टेम्पो व रिक्षा होते. मोटरसायकलवरील दोन इसमांना आम्ही पकडले. त्यापाठीमागील टेम्पो व रिक्षा यातील चालक वाहन चालू स्थितीत ठेवून अंधाराचा फायदा घेवून तेथून पळून गेले.

०३.   सदर टेम्पोचा क्रमांक एम्.एच्. ४८ सी.बी. ०३८३ असा होता व रिक्षेचा क्रमांक एम्.एच्. ४६ ए.झेड्. ४३४६ असा होता. टेम्पोमध्ये दोन कालवड व दोन गाई यांचे तोंड व पाय बांधून ठेवलेले व त्यांना कोंडून ठेवल्याचे दिसून आले. एक कालवड साधारण अडीच वर्षांची व दुसरी दोन वर्षे वयोगटाची होती. एक सहा वर्षांची तांबड्या रंगाची व दुसरी तीन वर्षे वयोगटातील साधारण तांबूस रंगाची होती. सदर ठिकाणी मोटरसायकलस्वार नागेश रामा लेंडी व त्याच्यासोबत असलेला शशिकांत दामोदर हंबीर मिळून आले. त्यांच्याकडे गाई कोठून आल्या यासंदर्भात चौकशी केली. त्यांनी कामतवाडी गावातील कृष्णा मधुकर लेंडी यांच्याकडून गाई आणल्याबाबत सांगितले.

०४.   रिक्षा चालू स्थितीत, काळ्या रंगाची व पुढील काच फुटलेली अशी होती. मोटरसायकल ही होंडा शाईन होती व ती काळ्या रंगाची व त्यावर पोपटी रंगाचा पट्टा होता. सदर मोटरसायकलला नंबर प्लेट नव्हती. त्यानंतर आम्ही पी.एस्.आय्. सांगळे व पी.एस्.आय्. पवार यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर पवार व सांगळे घटनास्थळी आले. त्यांनी घटनेबाबत खात्री केली. त्यानंतर घटनास्थळाचा पंचनामा केला. मी माझ्या मोबाईलमध्ये घटनास्थळाचे फोटो काढले. त्याबाबत मी भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ब चे प्रमाणपत्र दिले.

०५.   आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते. सदर टेम्पोमध्ये प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देवून दाटीवाटीने डांबून ठेवलेले होते. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहे. ते मी स्वत: माझ्या मोबाईलमधून काढलेले आहे. त्यासोबत मी भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी चे प्रमाणपत्र दिलेले आहे. फोटोंना **निशाणी क्र. २६/१** ते **२६/८** देण्यात येते. भारतीय पुरावा

कायदा कलम ६५ बी च्या प्रमाणपत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर प्रमाणपत्रास **निशाणी क्र. २७** देण्यात येते.

०६. त्यानंतर आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मी आरोपींना ओळखू शकतो. आरोपी नागेश, शशिकांत व सरफराज आज कोर्टात हजर आहेत. एक आरोपी आज न्यायालयात हजर नाही. त्याला पाहिल्यास मी ओळखू शकेन.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास मध्यान्हामुळे तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**
दिनांक : **१९/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व २ करीता वकील श्री. विक्रांत पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

०७. घटनेची माहिती मला पोलीस पाटील नंदकुमार जगन्नाथ म्हात्रे यांनी दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी सांगितल्यामुळे आम्ही घटनास्थळी गेलो. त्यांनी पहाटे ०२.०० वाजताच्या दरम्यान माहिती दिली, नक्की वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळी घटनास्थळी गेलो त्यावेळी तेथे अंधार होता. हे म्हणणे खरे आहे की, बिडवागळे गावाचा परिसर हा डोंगराळ आहे. मला हे माहिती नाही की, त्या परिसरामध्ये गाई गुरे फिरत असतात

०८. हे म्हणणे खरे आहे की, नागेश लेंडी व शशिकांत हंबीर यांना गाईंची वाहतूक करताना मी प्रत्यक्ष पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी

नागेश लेंडी व शशिकांत हंबीर यांना वाहतूक करताना पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नागेश लेंडी व शशिकांत हंबीर हे रिक्षा किंवा टेम्पो चालवत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर गाई कृष्णा मधुकर लेंडी यांच्याकडून आणल्या होत्या, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत वाहतूकीचा व क्रूरतेच्या वागणुकीशी आरोपी क्र. १ व २ चा काहीही संबंध नाही.

०९. हे म्हणणे खरे नाही की, टेम्पोमध्ये दोन गाई व दोन कालवड यांना बांधून ठेवले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाई काळ्या, तांबड्या व तांबूस रंगाच्या होत्या, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ चा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ करीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

१०. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा परिसर अंधाराचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, टेम्पो व रिक्षा चालकाचे वर्णन फिर्यादमध्ये दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अंधार असल्यामुळे मी त्यांचे चेहरे पाहिले नव्हते. पोलीस सांगळे व पवार हे पाऊण तासांनी घटनास्थळी आले. सांगळे घटनास्थळी येईपर्यंत आम्ही गाईंना हात लावला नव्हता. घटनास्थळ पंचनामा एक तास चालला होता.

११. पंचनामा झाल्यानंतर गाईंना गोशाळेमध्ये ठेवले. एफ्.आय्.आर. दाखल होण्याआधी गाईंना गोशाळेत पाठविले होते. गाईंना गोशाळेत पाठविताना पंचनामा केला होता किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. गाईंना बांधलेल्या दोऱ्या व मुसक्या मी जप्त केल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, गाईंना

दोऱ्याने बांधून ठेवले होते, हे मी खोटे सांगत आहे. फिर्याद दिल्यानंतर माझा पुन्हा जबाब नोंदविला नाही. टेम्पो व रिक्षाचे आर.सी. बुक मला सापडले नव्हते.

१२. फोटोग्राफी मी केलेली आहे, पवार यांनी केलेली नाही. पंचनाम्यामध्ये मी फोटो काढले अशी नोंद केलेली नाही. भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ब चे प्रमाणपत्र मी स्वत: बनविलेले आहे. फोटो प्रिंट काढण्यापूर्वी मी माझा मोबाईल ऑफीसमधील संगणकाला जोडला होता. हे म्हणणे खरे आहे की, संगणकामध्ये फोटो सेव्ह केले व नंतर त्यांची प्रिंट काढली. सदरचे फोटो संगणकामध्ये नवीन फोल्डर तयार करुन त्यामध्ये सेव्ह केले. हे म्हणणे खरे आहे की, तो संगणक व्यवस्थित चालू होता व त्यामध्ये छेडछाड झाली नाही याबाबत नोंद भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ब च्या प्रमाणपत्रामध्ये नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फोनमधील फोटो सेव्ह असताना त्यामध्ये कोणती छेडछाड केली नसल्याचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ब च्या प्रमाणपत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे व बनावट फोटो बनवून मी तपासी अंमलदारांना दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५ बी चे प्रमाणपत्र दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. ४ यांना कधीही पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. ४ ला ओळखतो असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **१९/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **५१/२०२४**
निशाणी क्र. **३१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **कुंदन कलेंद्र म्हात्रे** |
| वय सुमारे | : | २९ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | बिडवागळे, कुर्डुस, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. १९/०१/२०२४ रोजी सकाळी आमच्या बिडवागळे गावातील डोंगरावरुन एका टेम्पोमध्ये गुरे घेवून गेले होते. आम्ही त्या टेम्पोला अडविले. त्या टेम्पोमध्ये चार गाई होत्या. नागेश लेंडी हे टेम्पोच्या पुढे बाईक घेवून होते. त्याला आम्ही गाई घेवून जाण्याबाबत विचारले असता त्याने मी कामावर चाललो आहे असे सांगितले. त्याला टेम्पोमध्ये काय आहे याबाबत विचारले असता त्याने काही सांगितले नाही. आम्ही टेम्पो अडविला असता त्यामध्ये चार गाई होत्या. आम्ही टेम्पो पकडून मंदीराजवळ आणला असता त्यामधील लोक पळून गेले. त्यामधील लोक दोन मिनिटांतच पळून गेले व त्या ठिकाणी अंधार होता. त्यानंतर आम्ही पोलीस पाटील यांना बोलावले. त्यांनी पोलीस ठाण्यात फोन लावला. पोलीस आले व त्यांनी पंचनामा केला.

०२. टेम्पो टाटा इंडिका ह्या कंपनीचा होता. त्याचा रंग सफेद होता व त्याला दोन दरवाजे होते. टेम्पोचा क्रमांक आता मला आठवत नाही. त्या टेम्पोमध्ये गाईंना पिवळ्या रंगाच्या रस्सीने बांधलेले होते. पोलीसांनी नंतर गाईंना सोडविले. एक ऑटो रिक्षाही तेथे होती. टेम्पो व रिक्षा पोलीसांनी जप्त करुन

पोलीस ठाण्यात नेली होती. गाईंना पोलीसांनी नंतर गोशाळेमध्ये घेवून गेले होते. एकूण चार गुरे होती. पोलीसांनी पंचनामा केला. पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. ०१ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३२** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी क्र. १ नागेश लेंडी आज न्यायालयात हजर आहे. बाकी आरोपी पळून गेले होते त्यामुळे मी त्यांना ओळखत नाही.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपी क्र. १ व २ करीता वकील श्री. विक्रांत पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु** :

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझे पोयनाड पोलीस ठाण्यात नेहमी येणे जाणे असते. मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते मीच टेम्पो पकडला होता. दि. १९/०१/२०२४ रोजी रात्री ०३.३० वाजता म्हणजेच पहाटे मी पंचनाम्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस घटनास्थळी अंधार होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी अंधार असल्यामुळे मला समोरचे काही दिसत नव्हते.

०४. हे म्हणणे खरे आहे की, टेम्पो चालवणाऱ्या व्यक्तीला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा टेम्पो चालवत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा रिक्षा किंवा टेम्पो चालवत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ यांनी गाईंची वाहतूक केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ बाईक चालवत होते.

०५. गाई एक वर्ष, दोन वर्षे वयाच्या होत्या. त्यांचे नक्की वय मी सांगू

शकत नाही. रस्सी पिवळ्या रंगाची होती व अंदाजे दोन मीटर लांब होती. मी रस्सी पाहिली होती. पोलीस आले तेव्हा गाईंना सोडविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अगोदर तिथे हजर होतो व नंतर पोलीस आले होते. पंचनामा २.३० वाजता सुरु होवून ५.०० ते ५.३० वाजता संपला. मी पंचनाम्याच्या ठिकाणी गाडीने गेलो नव्हतो त्यावेळी मी तिथेच हजर होतो.

०६. हे म्हणणे खरे आहे की, बिडवागळे येथील रस्ता हा रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे रिक्षा, टेम्पो बाईक येत जात असतात. हे म्हणणे खरे आहे की, गावातील जनावरे तेथे चरण्यासाठी येत जात असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्यासाठी सदरचा पंचनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गाईंची वाहतूक करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ हे बाईकवरुन घटनास्थळावरुन प्रवास करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना गुन्ह्याकामी नाहक गोवलेले आहे. मी आरोपीचे मोबाईल क्रमांक सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिलेली आहे.

**आरोपी क्र. १ व २ करीता उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ४ करीता वकील श्री. अंकित बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०७. ह्या केसकामी पोलीसांनी माझा जबाब घेतलेला नाही. मी पंचनामा वाचला होता. पंचनामा २.०० ते २.३० वाजता सुरु होवून ५.०० वाजता संपला होता. पंचनाम्यामध्ये आम्ही आरोपींना पकडले होते व दोन आरोपी पळून गेले होते असे संगितले होते. दोन आरोपी जे पळून गेले होते त्यांचे चेहरे मी पाहिले नव्हते. आरोपींना मी पकडल्याबाबत व ते पळून गेल्याबाबत पंचनाम्यामध्ये लिहीलेले

नाही. मी एकूण किती सह्या केल्या होत्या हे मला आठवत नाही. सर्व झाल्यानंतर मी पोलीस ठाण्यातही गेलो होतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी पोलीस ठाण्यात गेलो नव्हतो. मी कंपनीमध्ये कामास आहे. विठोबा म्हात्रे आमच्या गावातील असून ते माझे बाबा लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना पकडले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पंचनामा झाल्याचे मी खोटे सांगत आहे. नंदकुमार म्हात्रे हे आमच्या गावातील पोलीस पाटील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी तयार पंचनाम्यावर पोलीस पाटलांच्या सांगण्यावरुन कुठेही न जाता सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

**(आरोपी क्र. ३ तर्फे आरोपीच्या वकीलांनी तो हजर राहात नसल्याबाबत व त्याचे वकीलपत्र काढून घेतल्याबाबत पुरशिस दाखल केली. आरोपी गैरहजर असल्यामुळे व त्याच्यातर्फे कोणताही गैरहजेरी माफीचा तसेच तहकुबीचा अर्ज दाखल नसल्यामुळे आरोपी क्र. ३ विरुद्ध वॉरंट काढण्यात येत आहे. आरोपी हा रोख रक्कम रुपये १५,०००/— च्या जामीनावर मुक्त आहे. त्याची जामीनाची रोख रक्कम जप्त करण्यात येवून सरकार जमा करण्यात यावी.)**

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०४/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.